# चांदवड महाविद्यालयात प्रशिक्षण व कॅम्पस ड्राइव्ह चे आयोजन

## अर्थशास्त्र विभाग

चांदवड येथील श्रीमान आबड कला, श्रीमान लोढा वाणिज्य व श्रीमान जैन विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व प्लेसमेंट सेल तर्फे दि. २७/०४/२०२३ रोजी भारतातील नामांकित व अग्रगण्य आय.सी.आय. सी .आय बँकेत Relationship Manager या पदावर नियुक्तीसाठी प्रशिक्षण पार पडले. सदर प्रशिक्षणासाठी आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी मा. प्रतिक जाधव , मा. प्रतिक कळवणकर मा. सुरज नंबियार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ.सुरेश पाटील सर होते . विद्यार्थ्यांनी नौकरी करण्यासाठी घरापासून दूर जाण्याची तयारी ठेवावी असे प्रतिपादन डॉ.सुरेश पाटील सर यांनी केले. मा. प्रतिक जाधव यांनी सदर पदासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा ,कामकाजाचे ठिकाण ,कामकाजाचे स्वरूप इतर माहिती दिली. तदनंतर लेखीपरीक्षा व गटचर्चा घेण्यात आली. या प्रशिक्षणात ९२ विद्यार्थी सहभागी झाले. सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी काही निवडक विद्यार्थ्यांची online पद्धतीने मुलाखत घेऊन १३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. आर.जे.इंगोले यांनी आजच्या तरुणानी बँकेचा जवळून अभ्यास केल्याशिवाय स्वंय-रोजगारापासून ते सामाजिक, आर्थिक, ओद्योगिक क्षेत्रात बदल घडून येऊ शकणार नाही असे प्रतिपादन केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अलका नागरे यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. प्रविण बाचकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विजया जाधव ,प्रा.अलका नागरे ,प्रा.प्रविण बाचकर प श्री मुरली शिंदे यांनी परिश्रम घेतात.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. सुरज नंबियार, व्यासपीठावर डॉ. आर. जे. इंगोले , मा .प्रतिक जाधव, मा.प्रतिक कळवणकर, डॉ.सुरेश पाटील , प्रा. अलका नागरे , प्रा. विजया जाधव, प्रा. प्रविण बाचकर.

COORDINATOR
Internal Quality Assessment Cell
SNJB's K.K.H.A.Arts, S.M.G.L. Commerce
& S.P.H.J. Science College,
Chandwad-423 101 Dist-Nashik

प्रभारी प्राचार्य
क.के.ह. आबड कला, श्री.मो.गि.लोढा वाणिज्य
व श्री.पी.एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्री.पे.द.सुराणा
कला व वाणिज्य (कनिष्ठ) महाविद्यालय
चांदवड, जि. नाशिक - ४२३ १०१